झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./ता.१/ ३०५५ /२०२५
दिनांक : १०/१०/२०२५

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

**(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये योजनेस अंतिम प्रशासकीय मान्यता)**

<u>प्रस्तावना :</u>

१. पेठ महात्मा फुले,फा.प्लॉट क्र. २१८ व २१९, सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ब व ६३३, गंज पेठ, पुणे झोपडपट्टी संदर्भात ८१३२.४३ चौ. मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि.यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.३०/१०/२००७ रोजी सदर मिळकतीवरील ७७.२५% झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदरचे क्षेत्र हे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, व ६३२ब साठी दि.२०/०२/२०२० व सि.स.नं. ६३३ साठी दि.२५/०४/२०२५ रोजी घोषित करण्यात आले आहे. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.२४/०७/२०२५ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये <u>"झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना"</u> सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त दावे/हरकत/सुचना संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

- सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/सुचना अथवा तक्रार या प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

३. दि.२२/०७/२०२५ रोजी प्रसिध्द केलेली प्रारूप योजना अंतिम करण्यात येत असून योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदरच्या योजनेत आवश्यकतेप्रमाणे वेळोवेळी बदल करण्यात येतील व ते झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस अवगत करण्यात येतील.

४. सदर योजनेद्वारे विकसक मे. नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

५. सदर योजनेचे विकसक मे. नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील.योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे अन्य संविधानिक प्राधिकरण तसेच झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम लागू राहतील व त्यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

६. सि.स.नं.६३३ च्या क्षेत्राकरीता मंजूर विकास नियंत्रण नियमावली सन २०२२ मधील नियम क्र.१४.६.२९ ची तरतूद नुसार शासकीय जमिनीचे २५% अधिमूल्य रक्कमेपैकी पहिल्या टप्यातील १०% रक्कम म्हणजे रक्कम रु.६६,८०,३०४/- भरणेबाबत दि.०३/०९/२०२५ रोजी विकसकास पत्र देणेत आले होते. त्यानुषंगाने विकसक यांनी दि.२९/०९/२०२५ रोजी सदर रकमेचा भरणा केला आहे.

७. सदर प्रशासकीय मान्यता मंजूर झालेनंतर योजनेसाठी लवकरात लवकर बांधकाम परवानगी प्राप्त करून घेणेची जबाबदारी विकसकाची राहील. तसेच सदर योजना परिपत्रक क्र.६/२०२४ दि.०२/०९/२०२४ नुसार बांधकाम परवानगी प्राप्त झालेल्या तारखे पासून ६० महिन्यामध्ये पूर्ण करणे विकसकावर बंधनकारक राहील

८. सदर योजना क्षेत्रासाठी झोपडपट्टी निर्मुलन आदेश पारित झाल्यानंतर विकसकास झोपडीधारकांच्या संक्रमण व्यवस्थेबाबत अथवा दरमहा भाडेबाबत झो.पु.प्रा परिपत्रकामधील सर्व अटी व शर्ती विकसकावर बंधनकारक राहतील.

९. सदर योजनेत सद्यस्थितीत कलम ३(क) नुसार घोषित केलेल्या क्षेत्रांतर्गत संबंधित असलेली सर्व सार्वजनिक (सामूहिक स्थळे) यांचे पुनर्वसन प्रचलित शासन निर्देशानुसार पुनर्वसन योजनेत नियोजन करणे विकासक यांच्यावर बंधनकारक राहील. बांधकाम परवानगीपूर्वी सदर बाबीची पडताळणी करणे आवश्यक राहील

१०. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील.

सदर योजना राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत असून माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह आदेश जारी करण्यात येत आहेत.प्रस्तुतचा निर्णय हा सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे असल्यास ते शीर्षस्थ तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे करता येईल याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १० /१०/२०२५

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

१०/१०/२०२५

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. विकसक- मे. नाईकनवरे डेव्हलपर्स प्रा.लि, १२०४/४, घोलेरोड, शिवाजीनगर, पुणे-४११००४
३. पेठ महात्मा फुले,फा.प्लॉट क्र. २१८ व २१९, सि.स.नं.५९३क, ६३१, ६३२अ, ६३२ब व ६३३, गंज पेठ, पुणे येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी सदर योजना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.